**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे






वर्ष ५ । अंक २३३ । शुक्रवार १२ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## एसपी मुम्मका सुदर्शन यांचा जोरदार धमाका

# शहरातील चारही पोलीस ठाण्यांचे कारभारी बदलले

### एलसीबीचे किरणकुमार कबाडी यांची वर्षाच्या आतच उचलबांगडी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील १९ पोलीस निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या झाल्या असून, त्यात नगर शहरातील कोतवाली, तोफखाना, भिंगार कॅम्प व एमआयडीसी या चारही पोलीस ठाण्यांचे कारभारी बदलण्यात आले आहेत. याशिवाय स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे (एलसीबी) पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांची वर्ष पूर्ण होण्याच्या आतच शिर्डीला उचलबांगडी झाली असून, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब बोरसे यांचीही घारगाव (ता. श्रीगोंदा) येथे लांब फेकण्यात आले आहे. शहर विभागातील चारही पोलीस ठाण्यांसह शहर वाहतूक शाखेचे कारभारी एकाच वेळी बदलण्याची ही पहिलीच वेळ आहे, तसेच तीन वर्षांचा कालावधी पूर्ण होण्याच्या आत बदली झालेले किरणकुमार कबाडी हेही नगरएलसीबीच्या इतिहासातील पहिलेच पोलीस निरीक्षक ठरले आहेत. एसपी मुम्मका सुदर्शन यांनी हा धाडसी निर्णय घेऊन पोलीस दलात मोठा धमाका केल्याचे मानले जात आहे. जिल्हा अपस्थापना मंडळाच्या बैठकीमध्ये एसपी मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील १९ प्रभारी पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक तसेच नियंत्रण कक्ष, आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढले.

बदली झालेल्या सर्व पोलीस निरीक्षक आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक अधिकाऱ्यांनी पदग्रहण अवधी न घेता तात्काळ बदली केलेल्या ठिकाणी हजर होऊन हजर झाल्याबद्दलचा अहवाल सादर करावा. हजर न झाल्यास पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या सूचनांप्रमाणे शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल असेही आदेशात आदेशात म्हटले आहे.

### बदली झालेले पोलीस ठाण्यांचे अधिकारी आणि त्यांचे बदलीचे ठिकाण याप्रमाणे

- किरणकुमार कबाडी (स्थानिक गुन्हे शाखा) - साई मंदिर सुरक्षा.
- संभाजी गायकवाड (कोतवाली) - दंगल विरोधी पथक.
- जगदीश भांबळ (तोफखाना) - नियंत्रण कक्ष.
माणिक चौधरी (एमआयडीसी) - आर्थिक गुन्हे शाखा.
- जगदीश मुलगीर (भिंगार) - आर्थिक गुन्हे. शाखा
- बाळासाहेब बोरसे (वाहतूक शाखा) - घारगाव.
- रवींद्र देशमुख (नियंत्रण कक्ष) - राहुरी.
- विलास पुजारी (पाथर्डी) - मानव संसाधन विभाग.
- किरण शिंदे (श्रीगोंदा) ते एएचटीयू.
- संजय ठेंगे (राहुरी) - श्रीगोंदा.
- नितीन देशमुख (श्रीरामपूर शहर) - कोतवाली.
- आनंद कोकरे (मानव संसाधन) - पाथर्डी.
- प्रताप दराडे (नियंत्रण कक्ष) - नेवासा.
- महेश पाटील (नियंत्रण कक्ष) - वाहतूक शाखा.
- दीपक सरोदे (नियंत्रण कक्ष) - राहाता.
- बालाजी वैद्य (नियंत्रण कक्ष) - तोफखाना.
- हनुमान गायकवाड (नियंत्रण कक्ष) - कर्जत.
- युवराज आठरे (आर्थिक गुन्हे शाखा) - लोणी.
- तेजश्री थोरात (कोतवाली) - भिंगार कॅम्प.
- हेमंत थोरात (घारगाव) - एमआयडीसी.

## नगर शहराची धुरा नव्या दमाच्या अधिकाऱ्यांकडे

### नगर शहरातील कायदा–सुव्यवस्थेसह संवेदनशीलतेचा मुद्दा हाताळण्याचे आव्हान

**अहिल्यानगर–** पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी गुरुवारी जिल्ह्यातील १९ पोलीस अधिका–यांच्या बदल्यांचे आदेश काढले. त्यात नगर शहरातील कोतवाली, तोफखाना, भिंगार कॅम्प, एमआयडीसी तसेच शहर वाहतूक शाखा व स्थानिक गुन्हे शाखा या सहा ठिकाणचे अधिकारी एकाच वेळी बदलण्यात आले आहेत. या निर्णयाने आता नगर तालुका वगळता नगरमध्ये सर्वत्र नव्या दमाचे अधिकारी दिसणार आहेत. या बदलाचे सर्वसामान्यांमधून स्वागत होत असून, नगर शहरातील कायदा–सुव्यवस्था राखण्याबरोबरच गेल्या काही महिन्यांपासून ऐरणीवर आलेला शहरातील धार्मिक संवेदनशील मुद्दा हाताळण्याची मोठी जबाबदारी व आव्हान या अधिका–यांसमोर असणार आहे.

गुन्हे शाखेचे किरणकुमार कबडी यांची साई मंदिर सुरक्षा विभागात बदली झाली आहे. मात्र गुन्हे शाखेचा तात्पुरता पदभार सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश भोये यांना देण्यात आला आहे. नितीन देशमुख यांची श्रीरामपूर शहर येथून कोतवाली पोलीस ठाणे तर बालाजी वैद्य यांची नियंत्रण कक्ष येथून तोफखाना पोलीस ठाणे आणि तेजश्री थोरात या महिला अधिकाऱ्याची कोतवाली पोलीस ठाण्यातून भिंगार कॅम्प येथे तर हेमंत थोरात यांची घारगाव येथून एमआयडीसी पोलीस ठाण्यात नव्यानेच नियुक्ती करण्यात आलेली आहे. महत्त्वाच्या असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेसह शहरातील संवेदनशील परिसरात असलेल्या पोलीस ठाण्यांचेही प्रभारी अधिकारी बदलले ■ पान ४ वर




राजेंद्र येंडे
दैनिक आकर्षण
उपसंपादक
९८८१५३०९१०


### हेमंत थोरात यांना कामगिरी करावी लागणार जोरात

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी हेमंत थोरात यांची नियुक्ती झाली आहे. थोरात हे घारगाव पोलीस ठाण्याची धुरा सांभाळत होते. थोरात यांनी यापूर्वी गुन्हे अन्वेषण शाखेत काम केल्यामुळे त्यांना शहरासह उपनगरांचा अनुभव आहे याच अनुभवाचा फायदा हेमंत थोरात यांना झालेला आहे. तसा विचार केला तर एमआयडीसी पोलीस ठाण्याचा परिसर सुद्धा संवेदनशील मानला जातो या परिसरात मोठमोठ्या इंडस्ट्रीज, छोटे कारखाने यासह झोपडपट्टीचा भागही मोठा आहे. कारखान्यात काम करण्यासाठी विविध राज्यातून आलेले कामगार याच ठिकाणी वास्तव्यास आहेत त्यामुळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात काम करणे जिकिरीचेच असते. परिसरात शांतता आणि सुव्यवस्था टिकून ठेवण्यासाठी थोरात यांना परिश्रम घ्यावे लागणार आहेत.

### बालाजी वैद्य यांच्या जबाबदारीत वाढ

नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले बालाजी वैद्य यांना पोलीस अधीक्षकांनी तोफखाना पोलीस ठाण्याचे प्रभारी म्हणून नियुक्ती दिली आहे. गुन्हेगारी आणि अवैध व्यवसायाच्या बाबतीत आघाडीवर असलेल्या तोफखाना पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी नियुक्ती मिळाल्याने बालाजी वैद्य यांच्या जबाबदारीत मोठी वाढ झाली आहे. या पोलीस ठाण्याच्या हद्दीत खून, मारामारी, चोऱ्या, चेन स्नॅचिंग, यासह अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यावर नियंत्रण मिळविण्याचे आव्हान बालाजी वैद्य यांच्यासमोर असणार आहे.

### अतिसंवेदनशील परिसर महिला अधिकाऱ्याच्या हाती

महिला अधिकारी तेजश्री थोरात यांची भिंगार कॅम्प येथे नियुक्ती झाली आहे.भिंगार कॅम्पचा परिसर अतिसंवेदनशील मानला जातो. या पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुकुंदनगर, गोविंदपुरा, नागरदेवळे, बुऱ्हाणनगर, आलमगीर आणि भिंगार शहर याचा समावेश होतो. भिंगार शहरातील गुन्हेगारीचा मुद्दा नेहमीच चर्चेत असतो. तसेच बाजूलाच असलेल्या मुकुंदनगर, आलमगीर हा परिसर अतिसंवेदनशील आहे. अशा अतिसंवेदनशील भागाची जबाबदारी आता महिला अधिका–याच्या हाती सोपविण्यात आली आहे. तेजश्री थोरात यांना कॅम्प पोलीस ठाण्यात काम करताना खमकी भूमिका घेऊन कायद्याचा धाक कसा असतो हे गुन्हेगारांना दाखवून द्यावे लागेल. जनतेचा विश्वास संपादन करून त्यांचेही सहकार्य घ्यावे लागेल.


### अपप्रवृत्तींचा बंदोबस्त करावा लागणार

अहिल्यानगर शहरात दोन धर्मांमध्ये तेढ निर्माण करणाऱ्या अपप्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर आहेत अशा गुन्हेगार व्यक्तींचा नवनियुक्त प्रभारी अधिकाऱ्यांनी वेळीच बंदोबस्त करणे गरचेचे आहे. पंधरा–वीस दिवसापूर्वी मुस्लिम धर्मियांच्या ईद सणाच्या दिवशी माळीवाड्यातील एका धार्मिक स्थळाजवळ एका बुरखाधारी महिलेने गोमास टाकल्याची घटना घडल्याने माळीवाड्यासह शहरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. या घटनेची तात्काळ दखल घेत कोतवाली पोलीस ठाण्याचे तात्कालीन पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी गांभीर्याने सलग पंधरा दिवस तपास करत. घटना घडलेल्या परिसरातील तब्बल दीडशे सीसीटीव्ही फुटेज तपासून अखेर गोमास टाकून गुन्हा करणाऱ्या महिलेला अटक केली. विशेष म्हणजे ही महिला हिंदू असून ती आपल्या उदरनिर्वाहासाठी भिक्षा मागण्याचे काम करते. देशमुख यांच्यापुढे कोतवाली हद्दीत शांतता आणि सुव्यवस्था राखण्याची मोठी जबाबदारी आहे. गणेश विसर्जन, शिवजयंती, श्रीराम नवमी,मोहरम, आंबेडकर जयंती, महात्मा फुले जयंती यांच्या मिरवणुकांसह विविध मोर्चे, आंदोलने हे प्रामुख्याने सर्व कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतच होते. नितीन देशमुख यांना जनतेचा विश्वास मिळवून त्यांचे सहकार्य मिळवणे अपेक्षित आहे.

## अशोक खरात खटल्यात ॲड. परिमल फळे सरकारतर्फे बाजू मांडणार

### विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांना करणार साहाय्य । राज्य सरकारची अधिसूचना जारी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राज्यभर चर्चेत असलेल्या भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणातील न्यायालयीन खटल्यांमध्ये सरकारची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी राज्य सरकारने अहिल्यानगर येथील नामवंत फौजदारी वकील ॲड. परिमल फळे यांची सहायक विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे. राज्य सरकारच्या विधी व न्याय विभागाने यासंदर्भातील अधिसूचना गुरुवारी (दि. ११ जून) जारी केली.

या बहुचर्चित प्रकरणात राज्य सरकारने यापूर्वीच ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे. आता त्यांच्या साहाय्यासाठी ॲड. परिमल फळे यांची सहायक विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आल्याने या खटल्याच्या सुनावणीकडे राज्यभराचे लक्ष लागले आहे.

राज्य सरकारच्या वतीने विधी व न्याय विभागाचे कक्ष अधिकारी राजेश मांजरेकर यांनी ही अधिसूचना प्रसिद्ध केली असून, त्यानुसार अशोक खरात याच्याविरोधातील न्यायालयीन प्रक्रियेत सरकारची बाजू मांडण्याची जबाबदारी ॲड. उज्ज्वल निकम आणि ■ पान ४ वर

## गुन्हेगारी आणि अवैध धंद्यांविरोधात खरवंडी कासारमध्ये ३ तास रास्ता रोको; बाजारपेठ कडकडीत बंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–**पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार परिसरात वाढलेली गुन्हेगारी, वाड्या–वस्त्यांवर होणारे दरोडे मुलिंचे अपहरण आणि अवैध धंद्यांविरोधात आज खरवंडी कासार येथील ग्रामस्थ आणि व्यापाऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. गुन्हेगारीला वेसण घालण्यासाठी आज संपूर्ण बाजारपेठ कडकडीत बंद ठेवून राष्ट्रीय महामार्गावर तब्बल तीन तास जोरदार रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. गावात वाड्या–वस्त्यांवर ■ पान ४ वर



(छाया : सतिष जगताप)

दंगल नको, रोजगार द्या,

## धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या खऱ्या मास्टर माईंडचा पोलिसांनी छडा लावावा - किरण काळे

### पोलिसांनी गंगा उद्यान नमाज पठण प्रकरणाचा देखील लवकरात लवकर छडा लावावा, ठाकरे शिवसेनेची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**
अहिल्यानगर शहरामध्ये काही समाजकंटकांना आपल्या राजकीय स्वार्थासाठी दंगल घडवून आणायची आहे. दंगल ही व्यापार, उद्योग, समाजाला उध्वस्त करते. बेरोजगार करते. नगरकरांना दंगल नको शांतता हवी आहे. उद्योग, व्यापारासाठी सकारात्मक



वातावरण, तरुणाईला दर्जेदार शिक्षण आणि याच शहरात रोजगार, एमआयडीसीत राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्या आयटी पार्क हवा आहे. गोरगरीब, ■ पान ४ वर

## लाडकी बहीण स्वावलंबी झाली पाहिजे

### खा. नीलेश लंके यांची रोजगारनिर्मितीची घोषणा । ३७८ असंघटित बांधकाम कामगारांना ११ हजार रुपयांच्या किटचे वितरण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** राज्य शासनाच्या लाडकी बहीण योजनेमुळे महिलांना आर्थिक मदत मिळत असली तरी त्यांनी केवळ अनुदानावर अवलंबून न राहता स्वतः च्या पायावर उभे राहिले पाहिजे. आमची लाडकी बहीण कोणावरही अवलंबून राहणारी नसून ती स्वतः कुटुंबाचा आधार बनली पाहिजे. त्यासाठी मतदारसंघात




विविध स्वयंरोजगार व उद्योगाधारित योजना राबविण्यात येणार असून महिलांना दरमहा २५ ते ३० हजार रुपये उत्पन्न मिळवून देणाऱ्या प्रकल्पांची अंमलबजावणी केली जाईल, अशी घोषणा खासदार डॉ. नीलेश लंके यांनी केली.

असंघटित बांधकाम कामगारांसाठी शासनाच्या योजनेअंतर्गत ३७८ लाभार्थ्यांना भांडी व इतर जीवनावश्यक साहित्य असलेल्या ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### पेट्रोल-डिझेल बचतीसाठी नवीन वाहन खरेदीवर तात्पुरती स्थगिती आणावी - स्वाती सिरसुल



अहिल्यानगर - आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशात भविष्यात पेट्रोल व डिझेलच्या पुरवठ्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असून त्यावर तातडीने उपाययोजना म्हणून नवीन वाहन खरेदीवर काही काळासाठी स्थगिती आणावी, तसेच इंधनाच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने ठोस धोरण आखावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या स्वाती सिरसुल यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे. सिरसुल यांनी म्हटले आहे की, आज भारतात करोडोच्या संख्येने विविध प्रकारची वाहने पेट्रोल व डिझेलवर चालतात. अमेरिका, इस्रायल, इराण तसेच तेल उत्पादक देशांमधील तणावपूर्ण आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशाला इंधन पुरवठ्याचा गंभीर प्रश्न भविष्यात भेडसावू शकतो. त्यामुळे इंधनाचा अनावश्यक वापर कमी करणे आणि नवीन वाहनांच्या खरेदीवर काही काळ निर्बंध आणणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी पुढे सांगितले की, देशातील इंधन वापराच्या वाढत्या प्रमाणाला आपण सर्वच जबाबदार आहोत. आज अनेक कुटुंबांमध्ये सदस्यांपेक्षा वाहनांची संख्या अधिक असल्याचे चित्र दिसून येते. चार सदस्यांच्या कुटुंबात सहा-सात दुचाकी आणि दोन-तीन चारचाकी वाहने असणे ही बाब सामान्य झाली आहे. वाहनांसाठी जागा नसल्याने अनेकजण सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यांच्या कडेला गाड्या उभ्या करतात. काही लोक केवळ श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यासाठी महागडी वाहने खरेदी करतात. अल्पवयीन विद्यार्थीही शाळा, क्लास किंवा महाविद्यालयात जाण्यासाठी दुचाकींचा वापर करताना दिसतात. तसेच एक-दोन किलोमीटर अंतरासाठीही पायी जाण्याऐवजी वाहनांचा वापर करण्याची सवय समाजात वाढत चालली आहे. परगावी जाण्यासाठी एसटी, रेल्वे किंवा इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याऐवजी अनेक जण एक-दोन व्यक्तींसाठी चारचाकी वाहनांचा वापर करतात. शासकीय कर्मचारी, प्राध्यापक, आयटी क्षेत्रातील कर्मचारी आणि इतर व्यावसायिक वर्गाकडूनही चारचाकी वाहनांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याचे दिसून येते. परिणामी लाखो लिटर पेट्रोल व डिझेलचा अपव्यय होत आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने एका कुटुंबाला किंवा व्यक्तीला आवश्यक असलेल्या वाहनांची मर्यादा निश्चित करावी, अशीही मागणी त्यांनी केली.

### खांबळी पाझर तलावातील पाणी व वीज चोरीप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोखे आंदोलन

अहिल्यानगर - खांबळी पाझर तलावातील कथित पाणी चोरी व वीज चोरीप्रकरणी वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागांकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचा आरोप करत पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोखे आंदोलन करण्यात आले. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना प्रतीकात्मक स्वरूपात 'राष्ट्रीय भ्रष्टोबा' घोषित करून त्यांच्या निषेधार्थ दोन दगडांना शेंडी-शेंदूर लावण्यात आला. तसेच त्यांच्या डोक्यात प्रकाश पडावा आणि जनतेच्या समस्या समजाव्यात यासाठी संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाचे प्रतिकात्मक प्रतिमा अर्पण करण्यात आले. या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, प्रकाश थोरात, अशोक सब्बन, रवी सातपुते, शंकर साळवे, तुकाराम बोरगे, पोपट भोसले, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. अमित थोरात, बाळासाहेब पालवे, वीरबहादूर प्रजापती, वाय. के. शेख यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# अहिल्यानगरमधील नागरिकांचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नियुक्तीचे स्वागत

**पूर्वीच्या निष्क्रिय अधिकाऱ्यांचा चव्हाट्यावर निषेध । सुप्रभात मॉर्निंग ग्रुपचा पुढाकार**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अन्न व औषध प्रशासन आयुक्त पदाचा पदभार स्वीकारताच अवघ्या तीन दिवसांत भेसळखोरांवर सर्जिकल स्ट्राईक करणारे धडाडीचे अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या पाठीशी आता नागरिक उभे राहत आहे. अहिल्यानगरमध्ये सुप्रभात मॉर्निंग ग्रुपचे सर्व सदस्य आणि जागरूक नागरिकांनी एकत्र येत जॉगिंग ट्रॅकवर अनोखे आंदोलन केले. या आंदोलनात तुकाराम मुंढे यांचा 'अभिनंदन फलक' लावून त्यांनी अन्न भेसळ विरोधात सुरु केलेल्या कारवाईचे स्वागत करण्यात आले आहे. तर पूर्वीच्या निष्क्रिय अधिकाऱ्यांचा चव्हाट्यावर 'निषेध करणारा फलक' लावून नागरिकांनी आपला तीव्र संताप व्यक्त केला.

तुकाराम मुंढे यांनी पदभार घेताच अवघ्या तीन दिवसांत ५३ धाडी टाकून ३३ भेसळखोरांना गजाआड केले, तसेच कोट्यवधी रुपयांचा बनावट व भेसळयुक्त मुद्देमाल जप्त केला. ''जर तीन दिवसांत एवढी मोठी कारवाई होऊ शकते, तर यापूर्वीचे अधिकारी वर्षानुवर्षे काय करत होते?'' असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. या संदर्भातील एक सविस्तर मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना देण्यात आले.

जनतेच्या आणि लहान मुलांच्या आरोग्याशी थेट संबंध असलेल्या विभागात तुकाराम मुंढे यांच्यासारख्या प्रामाणिक अधिकाऱ्याची नियुक्ती केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जाहीर आभार मानण्यात आले. पूर्वीच्या निष्क्रिय अधिकाऱ्यांची चौकशी करा, मुंढे यांच्या आधी या पदावर असलेल्या ज्या अधिकाऱ्यांनी डोळेझाक केली आणि ज्यांच्यामुळे भेसळखोरांचे रॅकेट फोफावले, अशा तत्कालीन अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

मुंढे यांच्या बदलीची 'फिल्डिंग' रोखा: प्रामाणिक अधिकाऱ्याची बदली करण्यासाठी भ्रष्ट लॉबी आणि हितसंबंधी सक्रिय होण्याची शक्यता असते. शासनाने कोणत्याही दबावाला बळी न पडता मुंढे याच पदावर पूर्ण संरक्षण द्यावे, अशी मागणी नागरिकांनी लावून धरली आहे. ''लहान मुलांच्या दुधापासून ते आजारपणातील औषधांपर्यंत सर्वच गोष्टींमध्ये भेसळ करणाऱ्या नराधमांना पोसणाऱ्या व्यवस्थेचा यावेळी तीव्र निषेध करण्यात आला.

यामध्ये सुप्रभात मॉर्निंग ग्रुपचे सदस्य, महिला भगिनी आणि तरुणांचा प्रचंड सहभाग होता. लहान मुलांच्या आरोग्याचा प्रश्न असल्याने महिलांचा सहभाग अत्यंत लक्षणीय होता. ''मुंढे साहेबांचे अभिनंदन झालेच पाहिजे आणि आधीच्या कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे,'' अशी एकच भावना सर्वांच्या मुखातून व्यक्त होत होती.

या आंदोलनातून अहिल्यानगरमध्ये सध्या प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या समर्थनार्थ आणि भ्रष्ट व्यवस्थेच्या विरोधात एल्गार पुकारण्यात आला. यावेळी सुप्रभात ग्रुपचे सदस्य शिवाजीराव साळवे, ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल लांडगे, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब सोनवणे, विजय कुलाळ, साहेबराव आनंदकर, शैलेश राजगुरू, सुभाष मिसाळ, सूर्यकांत दगडे, भास्कर मिसाळ, बाळकृष्ण आव्हाड, वसंत सिंग, सुनील राऊत, रमेश पळसे, सुनील कुलकर्णी, बाळासाहेब कुलकर्णी, राजेंद्र दासरी, विजय पाटोळे, जालिंदर तनपुरे स्वानंदी महिला ग्रुपच्या सर्व सदस्या सौ. सोनल जोशी, आशा विधाते, संध्या वारे, वर्षा गुरनानी आदी उपस्थित होते.

# मराठी मिशनच्या शाळेस 'ग्रीन सिटी' अंतर्गत रोपे पुरविणार- धनंजय जाधव



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि शहर सुशोभित करण्याकरीता नामदार श्री,. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली 'ग्रीन सिटी' कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्याकरिता मिशन च्या शाळेस रोपे पुरविण्यात येतील असे उपमहापौर ॲड.धनंजय जाधव यांनी सांगितले.मिशन बॉईज हायस्कूलचे माजी विद्यार्थी श्री.रफिक मुन्शी यांनी श्री जाधव यांना भेटून चर्चा केली, आणि विहित नमुन्यात वृक्ष लागवड करण्याकरिता मागणी पत्र देण्यात आले.याबाबत सीएसआरडी चे संचालक श्री.सुरेश पठारे यांनी उपमहापौर श्री धनंजय जाधव यांना संस्थेस भेट देण्याची विनंती केली. तसेच मिशन ट्रस्ट चे विजया जाधव यांनी वृक्ष संवर्धन करण्याचे आश्वासन देऊन,वृक्षारोपण करण्याकरिता परवानगी पत्र सादर केले. लौकरच बॉईज हायस्कूल, क्लेरा ब्रूस मुलींची शाळा आणि अध्यापक विद्यालयात उपमहापौर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या दीर्घ, प्रामाणिक आणि समर्पित सेवेला मानवंदना देण्यासाठी एस.टी. को-ऑप बँक लि.च्या अहिल्यानगर व श्रीरामपूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात एसटी महामंडळातील विविध आगारातून निवृत्त झालेल्या सुमारे ६० कर्मचाऱ्यांचा सपत्निक सत्कार करून त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय वाहतूक अधिकारी कमलेश भारती, कामगार अधिकारी बाळासाहेब एकशिंगे तसेच एसटी बँकेचे माजी व्यवस्थापकीय संचालक व प्राथमिक शिक्षक बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत जगताप उपस्थित होते.

एसटी को-ऑप बँकेचे संचालक बालाजी शिंदे आणि प्रवीण जाधव यांच्या हस्ते निवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. सत्कारप्रसंगी मान्यवरांनी निवृत्त कर्मचाऱ्यांना शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह आणि भेटवस्तू देऊन त्यांच्या सेवेला कृतज्ञतापूर्वक सलाम केला. याशिवाय एसटी बँकेचे शाखा व्यवस्थापक, कर्मचारी, एसटी सेवानिवृत्त कर्मचारी संघटना आणि एसटी मधील विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी देखील यावेळी मनोगत व्यक्त करून सेवानिवृत्तांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

संचालक बालाजी शिंदे म्हणाले की, ''एसटी महामंडळ ही केवळ वाहतूक व्यवस्था नसून लाखो प्रवाशांच्या जीवनाशी जोडलेली सेवा आहे. या सेवेला बळकटी देण्यासाठी आपल्या सर्व निवृत्त सहकाऱ्यांनी आयुष्यभर परिश्रम घेतले. आज आपण ज्या ठिकाणी आहोत, त्यामागे त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या सेवेला सलाम करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# श्री सांदीपनी ॲकॅडमीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा व डॉ. के. बालराजु लिखित 'इनऑरगॅनिक केमिस्ट्री' पुस्तकाचे प्रकाशन

**विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी शिक्षणाला खूप महत्त्व – महापौर ज्योतीताई गाडे**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शिक्षण क्षेत्रात अमूलाग्र बदल झाले असून ज्ञान, कौशल्य आणि स्पर्धात्मकता यांना आजच्या काळात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे. शिक्षण हीच प्रगतीची गुरुकिल्ली असून त्याच्या बळावर विद्यार्थी देशाच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. श्री सांदीपनी ॲकॅडमीच्या माध्यमातून अहिल्यानगर शहरात गुणवंत, कर्तृत्ववान आणि स्पर्धात्मक विद्यार्थी घडविण्याचे उल्लेखनीय कार्य सुरू आहे. डॉ. के. बालराजु कर्री यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, योग्य दिशा आणि आधुनिक अभ्यासपद्धतीची माहिती मिळत आहे. त्यामुळे स्पर्धेच्या या युगामध्ये आपल्या शहरातील विद्यार्थी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करू शकतील. उद्याच्या उज्ज्वल भारताच्या निर्मितीत हे विद्यार्थी महत्त्वाची भूमिका बजावतील. विशेष म्हणजे अकॅडमीच्या माध्यमातून गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांनाही शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जात आहे. डॉ. के. बालराजु लिखित 'इनऑरगॅनिक केमिस्ट्री' हे पुस्तक देशातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि करिअर घडणीसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

श्री सांदीपनी ॲकॅडमीच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आणि डॉ. के. बालराजु लिखित 'इनऑरगॅनिक केमिस्ट्री' पुस्तकाच्या प्रकाशनाचा भव्य सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, संस्थापक अध्यक्ष डॉ. बालराजु कर्री, प्राध्यापक नानासाहेब बारहाते, राहुल गुजराल, संचालिका मोनिका बालराजु कर्री यांच्यासह शिक्षक, पालक, गुणवंत विद्यार्थी आणि शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये विविध स्पर्धा परीक्षा, अभियांत्रिकी, वैद्यकीय प्रवेश परीक्षा तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशामागील त्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांचे कौतुक करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी संस्थापक अध्यक्ष डॉ. बालराजु कर्री म्हणाले की, श्री सांदीपनी ॲकॅडमीची स्थापना ग्रामीण भाग आणि छोट्या शहरातील विद्यार्थ्यांनाही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तराचे दर्जेदार शिक्षण व मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने करण्यात आली. महाराष्ट्र आणि भारतातील सर्वोत्तम अभियांत्रिकी आणि वैद्यकीय संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देणे हा अकॅडमी स्थापनेमागील प्रमुख हेतू होता. या उद्देशाने २०१५ साली सावेडी, अहिल्यानगर येथे श्री सांदीपनी ॲकॅडमीची सुरुवात करण्यात आली.

# नागरदेवळेच्या मातीतून उगवली 'दृष्टीदान' क्रांती!



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** एका छोट्याशा गावातून सुरू झालेली चळवळ आज हजारो कुटुंबांच्या आयुष्यात प्रकाश पेरत आहे. नगर तालुक्यातील नागरदेवळे येथील जालिंदर बोरुडे यांनी सामाजिक बांधिलकीतून सुरू केलेली नेत्रदान चळवळ आज अनेकांसाठी आशेचा किरण ठरली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या फिनिक्स सोशल फाऊंडेशनने मरणोत्तर नेत्रदानाच्या माध्यमातून तब्बल ११६० दृष्टीहीन व्यक्तींना नवदृष्टी मिळवून दिली आहे.

'नेत्रदान हेच सर्वश्रेष्ठ दान' या ब्रीदवाक्याने प्रेरित होऊन गेली तीन दशके सुरू असलेले हे कार्य आज राज्यभरात आदराने पाहिले जाते. फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून केवळ नेत्रदान जागृतीच नव्हे, तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मोफत नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांचे मोठे जाळे उभे करण्यात आले आहे.

जलसंपदा विभागात टेलिफोन ऑपरेटर म्हणून कार्यरत असताना जालिंदर बोरुडे यांच्या मनात समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा निर्माण झाली. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या कार्यातून प्रेरणा घेत त्यांनी १९९१ मध्ये फिनिक्स फाऊंडेशनची स्थापना केली. सुरुवातीला नेत्रदान क्षेत्रात काम करण्याचा कोणताही ठराविक विचार नव्हता. मात्र विडी कामगार, हमाल, बांधकाम मजूर, शेतकरी, कष्टकरी, महिला आणि गरीब घटकांमधील दृष्टीदोषाच्या समस्या पाहून त्यांनी या क्षेत्रात काम करण्याचा निर्धार केला. त्यानंतर सुरू झालेला प्रवास आज हजारो कुटुंबांच्या आयुष्यात प्रकाश आणणारा ठरला आहे.

फिनिक्स फाऊंडेशनच्या माध्यमातून दरमहा जिल्ह्यातील विविध भागांत मोफत नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे आयोजित केली जातात. नागरदेवळे, पारनेर, शेवगाव, नेवासा, पाथर्डी तसेच नगर शहरात नियमितपणे ही शिबिरे भरविली जातात. विशेष म्हणजे, प्रत्येक महिन्याच्या १० तारखेला नागरदेवळे येथे आयोजित करण्यात येणाऱ्या शिबिराचा लाभ राज्यातील विविध जिल्ह्यातून येणारे अनेक गरजू रुग्ण घेत आहेत. आतापर्यंत सुमारे ३ लाख ९७ हजार ४४७ रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली असून हजारो नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प केला आहे.

समाजकार्यात अनेकदा अडथळे येतात. ''घरचं खाऊन कशाला लष्कराच्या भाकऱ्या भाजता?'' अशा स्वरूपाचे टोमणेही जालिंदर बोरुडे यांना अनेकदा ऐकावे लागले. मात्र त्यांचे उत्तर कायम एकच असते ''समाधान मिळतं ना, मग बस!'' हेच समाधान त्यांना गेली ३५ वर्षे या चळवळीत कार्यरत ठेवत आहे. आज त्यांच्या कार्यामुळे हजारो रुग्ण त्यांना आपल्या कुटुंबातील व्यक्तीप्रमाणे मानतात.

नेत्रदान चळवळीचा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावा यासाठी जालिंदर बोरुडे यांनी 'दृष्टीमित्र' आणि 'नेत्रज्योत' ही दोन प्रेरणादायी पुस्तके लिहिली आहेत. आजही फिनिक्स फाऊंडेशनच्या शिबिरांमध्ये राज्यभरातून नागरिक सहभागी होत असून नेत्रदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे.

# शासनाने पुरस्कार प्राप्त व्यक्तींना मानधन सुरू करावे

**आमदार अमित गोरखे यांना निवेदन**



**मुंबई –** राज्यभर मातंग समाजाचे अ ब क ड उपवर्गीकरण व्हावे.यासाठी अहिल्यानगर मातंग समाजाच्या वतीने मा.आमदार अमित गोरखे यांची मंत्रालय मुंबई येथे जाऊन मातंग समाजाचे ज्येष्ठ समाजसेवक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त नामदेवराव चांदणे यांच्या नेतृत्वात व महालक्ष्मी देवस्थानचे अध्यक्ष उमेश साठे यांनी अ ब क ड उपवर्गीकरण संदर्भात निवेदन देण्यात आले.यावेळी संतोष शेलार, सतीश खळवे,राजेंद्र आल्हाट, संजय शेलार,प्रमोद आरणे, शेषराव कारखेलेकर,संजय विरूळे,गोविंद सूर्यवंशी, अविनाश साठे,लक्ष्मण तिकटे, सुदामराव आवाडे आदी उपस्थित होते.

या निवेदनात सांगितल्याप्रमाणे साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त व्यक्तींना प्रति महिना १५ हजार रुपये प्रमाणे मानधन देण्यात यावे. तसेच एसटी महामंडळाच्या सर्व बसेस मध्ये विना मूल्य प्रवास सुविधा मिळावी.या मागणी चे निवेदन मातंग समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

यावेळी आमदार अमितजी गोरखे यांनी असे आश्वासन सकल मातंग समाज बांधवांना दिले की लवकरच अहिल्यानगर शहरात सकल मातंग समाज मेळावा.घेण्यासाठी तारीख जाहीर करणार आहोत.व अ, ब, क, ड.उपवर्गीकरणासंदर्भात आपण दिलेले निवेदन शासनाकडे अंमलबजावणी साठी प्रयत्न करण्यात येईल.असे त्यांनी सांगितले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### सीए डॉ. शंकर अंदानी यांच्या खांद्यावर ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची धुरा



अहिल्यानगर - निमगाव वाघा (ता. नगर) येथे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने २५ जुलै रोजी आषाढी एकादशी तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त 'जगतगुरु संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी साहित्य, समाजकारण आणि लेखा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे अहिल्यानगरचे सुपुत्र सीए (डॉ.) प्रा. शंकर घनशामदास अंदानी यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. संमेलनाच्या नियोजनासाठी शहरात आयोजित बैठकीत संयोजन समितीने सीए अंदानी यांच्या नावावर एकमताची मोहर उमटविली. संमेलनाचे प्रमुख संयोजक पै. नाना डोंगरे यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. यावेळी ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, प्रा. गणेश भगत, जालिंदर बोरुडे, संजय सावंत, संदीप रासकर, सरोज आल्हाट यांच्यासह साहित्यप्रेमी आणि पदाधिकारी उपस्थित होते. सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी यांनी मराठी आणि हिंदी साहित्य क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. साहित्य निर्मितीच्या क्षेत्रात त्यांनी अनेक अभूतपूर्व विक्रम नोंदविले असून एकाच दिवशी तब्बल १०६ स्वलिखित पुस्तके प्रकाशित करण्याचा जागतिक विक्रम त्यांच्या नावावर आहे. याशिवाय 'आई' या विषयावर आधारित ५१२१ कवितांचा जगातील सर्वात मोठा हिंदी काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचाही मान त्यांनी मिळविला आहे.येणार आहे. तसेच काव्यसंमेलनात अनेक नामवंत कवी-कवयित्री आपल्या रचना सादर करणार आहेत. समाजातील विविध क्षेत्रांत निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी विशेष पुरस्कारांचे वितरणही या संमेलनात करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

### अंधश्रद्धेचा त्याग करून विज्ञानाची कास धरा- विजय हुसळे



अहिल्यानगर - जोपर्यंत भारतातील बहुजन समाज अंधश्रद्धेतून बाहेर पडून विज्ञानाची कास धरत नाही, तोपर्यंत तळागाळातील बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास होणार नाही असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक तथा जिल्हा कोषाध्यक्ष आयुष्यमान विजय हुसळे यांनी केले. माता रमाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगर शहर शाखेच्या वतीने गुरुवार सिद्धार्थ बुद्ध विहार, सदर बाजार, भिंगार येथे अंधश्रद्धा निर्मूलन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भगवान बुद्धांच्या मूर्तीला पुष्प अर्पण करण्यात आले तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सरचिटणीस लक्ष्मण माघाडे यांनी मेणबत्ती व अगरबत्ती प्रज्वलित करून सामुदायिक त्रिसरण व पंचशील ग्रहण करून घेतले. यावेळी केंद्रीय शिक्षक विजय हुसळे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच संरक्षण उपाध्यक्ष संतोष गायकवाड, प्रचार पर्यटन सचिव रवींद्र कांबळे, संरक्षण सचिव गोरख केदारे, केंद्रीय शिक्षक प्रकाश कांबळे, समता सैनिक दलाचे मेजर बाळू कांबळे, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड यांचा सन्मान करण्यात आला. भिंगार परिसरातील उपस्थित महिलांचे स्वागत भारतीय बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष दिपक पाटोळे, सरचिटणीस लक्ष्मण माघाडे, संस्कार उपाध्यक्ष युवराज बनसोड, प्रचार पर्यटन उपाध्यक्ष मोहन शिरसाट, हिशोब तपासणीस राजेंद्र पाडळे, कार्यालयीन सचिव विजय पाटोळे, संरक्षण सचिव बापू भिंगारदिवे, संरक्षण उपाध्यक्ष मिलिंद घाटेशाही, सचिव विजय कांबळे, संघटक संजय डहाणे, संतोष जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

---

आ.संग्राम जगताप यांच्या वाढदिवसा निमित्त विकासकामांची भेट

# प्रभाग क्रमांक २ मधील परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध - नगरसेविका त्र्यंबके

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी उपनगरात प्रभाग क्रमांक २ मध्ये नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त संदेशनगर व परिसरातील चौक सुशोभीकरण,श्रीराम चौक ते वसंत टेकडी या महत्त्वाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला पेव्हिंग ब्लॉक बसवून सुशोभीकरण अशा विविध विकास कामाचा शुभारंभ नगरसेविका रोशनी ताई त्रंबके यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. या विकासकामामुळे परिसरातील नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार असून परिसराच्या सौंदर्यातही भर पडणार आहे. या प्रसंगी नगरसेवक निखिल वारे, महेश तवले, बाळासाहेब पवार, सुनील त्र्यंबके, विनीत पाऊलबुधे, आकाश त्र्यंबके, सुजाता शिंदे,सुरेखा बनकर, राजश्री पिंपळे, भास्कर चेमटे,किशोर वाणे,महेश टाक, गोरक्षनाथ आव्हाड, वैभव पोकळे, विद्याधर कुलकर्णी, प्रकाश कलंके, दत्तात्रय जरे, कृष्णा आंधळे धीरज उकिरडे, देविदास गुडा, अमर मेट्टू, विकी करोलिया सचिन लोटके तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रभागातील रस्ते, सार्वजनिक सुविधा आणि मूलभूत विकासकामांना प्राधान्य देत नागरिकांच्या



अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. श्रीराम चौक ते वसंत टेकडी हा परिसर दाट लोकवस्तीचा असून या रस्त्याच्या सुशोभीकरणामुळे वाहतुकीची सुविधा सुधारण्याबरोबरच परिसर अधिक आकर्षक आणि सुस्थितीत दिसणार आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली शहरात विविध विकासकामे वेगाने मार्गी लागत असल्याचेही उपस्थितांनी नमूद केले.

शुभारंभ प्रसंगी बोलताना नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके म्हणाल्या की, आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त नागरिकांना विकासकामांची भेट देणे हीच त्यांना खरी शुभेच्छा ठरणार आहे. यावेळी नगरसेवक निखिल वारे म्हणाले शहराच्या प्रत्येक भागात दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात, रस्ते सुस्थितीत राहावेत आणि नागरिकांचे जीवनमान उंचावावे यासाठी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील डॉ. सुजय विखे पाटील, आ.संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक २ मध्ये अनेक विकासकामे हाती घेण्यात आली असून भविष्यातही नागरिकांच्या गरजांनुसार विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. संदेश नगर चौक सुशोभीकरण, त्याच बरोबरच रोजगार उपलब्ध होण्यासाठी चौपाटी करण्याचा आमचा मानस आहे. असे वारे यांनी सांगितले.

बाळासाहेब पवार आपल्या भाषणात म्हणाले की, विकास हा केवळ आश्वासनांचा विषय नसून तो प्रत्यक्ष कृतीतून दिसला पाहिजे. नागरिकांनी दाखविलेला विश्वास आणि सहकार्य यामुळेच विविध कामे मार्गी लागत आहेत. प्रभागातील प्रत्येक रस्ता, गटार, पाणीपुरवठा आणि सुशोभीकरणाच्या कामांमध्ये गुणवत्ता राखण्यास प्राधान्य दिले जाणार असून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही ४ ही नगरसेवक सदैव उपलब्ध राहू. परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांचे परस्पर सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित नागरिकांनी या विकासकामाबद्दल समाधान व्यक्त करत आमदार संग्राम जगताप आणि नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके, नगरसेवक निखिल वारे, महेश तवले, बाळासाहेब पवार, यांचे आभार मानले. परिसराच्या विकासासाठी अशाच प्रकारे सातत्याने कामे सुरू राहावीत, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली.

---

## एसटी सेवानिवृत्तांचे राज्यस्तरीय वार्षिक अधिवेशन नंदुरबार येथे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्य परिवहन कर्मचारी संघटनेच्या वतीने एसटी महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे दोन दिवसीय राज्यस्तरीय वार्षिक अधिवेशन १२ व १३ जून रोजी नंदुरबार येथे आयोजित करण्यात आले आहे. संघटनेचे सरचिटणीस सदानंद विचारे यांच्या नेतृत्वाखाली आणि कार्याध्यक्ष श्रीराम गालेवाड यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या अधिवेशनात राज्यभरातील हजारो सेवानिवृत्त कर्मचारी सहभागी होणार असून, पेन्शन, ईपीएस-९५, संघटनेची भावी वाटचाल आणि आंदोलनात्मक भूमिका यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे.

राज्याची 'दक्षिण काशी' म्हणून ओळख असलेल्या नंदुरबार येथील गजानन महाराज मंदिर, कोकणी हिल बसस्टॉपजवळ या ठिकाणी हे अधिवेशन पार पडणार आहे. या अधिवेशनात अहिल्यानगर जिल्ह्यातील एसटी सेवानिवृत्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन बलभीम कुबडे, गोरख बेळगे, गंगाधर कोतकर, अर्जुन बकरे आणि विठ्ठल देवकर यांनी केले आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनात गेल्या वर्षभरात झालेल्या केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठका, उच्चाधिकार समितीच्या सभा, पेन्शन समितीच्या बैठका तसेच विविध प्रादेशिक चिंतन मेळाव्यांमधील निर्णयांचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. संघटनेच्या कार्याचा लेखाजोखा मांडण्याबरोबरच आगामी काळातील धोरणात्मक दिशा निश्चित करण्यावरही भर दिला जाणार आहे. याशिवाय सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठीच्या केंद्रीय कार्यकारिणीला मंजुरी देणे, पेन्शन विषयातील अभ्यासू व अनुभवी सेवानिवृत्तांची समित्यांवर निवड करणे आणि संघटनेच्या विविध उपक्रमांबाबत निर्णय घेणे या महत्त्वाच्या बाबींवर चर्चा होणार असल्याची माहिती बलभीम कुबडे यांनी दिली.

एसटी प्रशासन आणि भविष्य निर्वाह निधी कार्यालयामध्ये ईपीएस-९५ संदर्भातील प्रशासकीय शुल्काच्या प्रश्नावर सध्या न्यायालयीन लढाई सुरू आहे. या संदर्भात संघटनेने उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तसेच मुख्य विधी सल्लागार यांच्याशी सातत्याने चर्चा सुरू ठेवली असून, या समस्येवर मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सरचिटणीस सदानंद विचारे यांनी सांगितले.

त्यांनी सांगितले की, राज्यातील अनेक विभागांमध्ये पेन्शनचे दावे प्रलंबित आहेत. ऑक्टोबर २०२५ पासून भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने प्रशासकीय शुल्क संगणकीय पद्धतीने भरण्याची अट घातल्यामुळे अनेक सेवानिवृत्तांची पेन्शन प्रक्रिया रखडली आहे. परिणामी अनेक पात्र कर्मचारी अद्याप पेन्शनपासून वंचित आहेत.

महामंडळाला प्रशासकीय शुल्क न भरण्याबाबत न्यायालयाने आदेश दिलेले असतानाही भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून त्या आदेशांची अंमलबजावणी होत नसल्याची खंत विचारे यांनी व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, न्यायालयीन निर्देशांकडे दुर्लक्ष करून आडमुठेपणाचे धोरण अवलंबले जात असल्याने महामंडळाने संबंधित कार्यालयाविरोधात अवमान याचिकाही दाखल केली आहे. या संपूर्ण प्रकरणाचा पाठपुरावा संघटना सातत्याने करत असून, आवश्यक असल्यास भविष्यात आंदोलनात्मक भूमिका घेण्याबाबतही या अधिवेशनात चर्चा होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वर्षभरासाठी मोफत प्रवासाचा एसटी पास मिळवून देणे हे संघटनेचे मोठे यश असल्याचेही सदानंद विचारे यांनी नमूद केले. या

---

## मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या यशस्वी वाटचालीला हरित सलाम नागरदेवळे-बुऱ्हानगरमध्ये वृक्षारोपण व स्वच्छता अभियान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या १२ वर्षांच्या यशस्वी कारकिर्दीच्या निमित्ताने नागरदेवळे-बुऱ्हानगर परिसरात वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियान उत्साहात पार पडले. भाजपा आमदार अक्षय कर्डिले यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनासह सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. मोदी सरकारच्या विकासाभिमुख आणि जनकल्याणकारी धोरणांना अभिवादन करत विविध ठिकाणी वृक्षलागवड करण्यात आली. तसेच परिसर स्वच्छ ठेवण्याचा निर्धार व्यक्त करत कार्यकर्त्यांनी स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला. या उपक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी बोलताना आमदार अक्षय कर्डिले यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे राष्ट्र प्रथम या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून देशसेवा करत आहेत. गेल्या १२ वर्षांत गरीब, शोषित, वंचित आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे ऐतिहासिक कार्य मोदी सरकारने केले आहे. विकसित भारताच्या दिशेने देश वेगाने वाटचाल करत असून जनतेचा विश्वास हीच या यशाची खरी ताकद आहे. तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर मोदी सरकारची १२ वर्षे : विश्वास, विकास आणि जनकल्याण या अभियानांतर्गत ५ जून ते २१ जूनदरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली. या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक बूथ स्तरावर वृक्षलागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले.

पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि जनजागृतीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात स्थानिक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कामगिरीला हरित सलाम देत परिसरात विकास आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी सरपंच राम पानमळकर, उपसरपंच सोनू भुजबळ, राहुल पानसरे, दरवाडी सरपंच अनिल करंडे, बाजार समिती संचालक संतोष म्हस्के, सुधीर भापकर,पंचायत समिती बीडीओ देसले, अण्णा चौधरी, दत्ता तापकिरे, महेश झोडगे, रावसाहेब कर्डिले, रवी कर्डिले,सागर बनकर, मयूर पाखरे, अजय गारदे, सुरेंद्रसिंग घारु, मंजाबाप्पू घोरपडे, भाऊसाहेब ठोंबे, आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

---

## प्रोफेसर कॉलनी चौक येथे आमदार संग्राम जगताप व संपत बारस्कर यांच्या वाढदिवसानिमित्त फळांच्या झाडांचे मोफत वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरणाच्या वाढत्या ऱ्हासामुळे ऋतुमानामध्ये दिवसेंदिवस मोठे बदल होताना दिसत आहेत. कोणत्याही ऋतूमध्ये ऊन, वारा, पाऊस आणि थंडी यांचा अनियमित अनुभव नागरिकांना येत असून त्याचा थेट परिणाम मानवी आरोग्यावर होत आहे. वाढते तापमान, कमी होत चाललेले हरित क्षेत्र आणि बदलते हवामान यामुळे पर्यावरणाच्या समतोलासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन ही काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. याच उद्देशाने 'एक कुटुंब एक झाड' या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली असून नागरिकांमध्ये जनजागृती करत मोफत फळझाडांचे वाटप करण्यात येत असल्याचे प्रतिपादन किरण संपत बारस्कर यांनी केले.

आमदार संग्राम जगताप आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या वाढदिवसानिमित्त प्रोफेसर कॉलनी चौक येथे फळझाडांचे मोफत वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. किरण संपत बारस्कर यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी प्राध्यापक माणिकराव विधाते, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, शिवाजी डोके, सतीश ढवण, गजेंद्र भांडवलकर आयोजक प्रसाद विसपुते अंकुश बोरुडे योगेश एरंडे महेश गलांडे गिरीश जगताप राहुल कातोरे विनोद जोंधळे अरुण रेपाळे यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना किरण संपत बारस्कर म्हणाले की, प्रभाग क्रमांक एकमध्ये गेल्या दोन वर्षांपासून नागरिकांनी मोठ्या प्रमाणात आंब्याच्या वृक्षांचे रोपण आणि संवर्धन करण्याचे काम केले आहे. त्याचा सकारात्मक परिणाम आज दिसून येत असून अनेक घरांसमोर आंब्याची झाडे डौलाने उभी आहेत. ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्ष आहेत, त्या भागातील तापमान तुलनेने कमी असल्याचेही दिसून येते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपणाबरोबरच वृक्षांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. 'एक कुटुंब - एक झाड' हा उपक्रम भविष्यात हरित अहिल्यानगर घडविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्राध्यापक माणिकराव विधाते म्हणाले की, वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन हे केवळ एखाद्या व्यक्तीचे काम नसून ती संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. पर्यावरणाचे रक्षण करायचे असेल तर प्रत्येकाने स्वतः पुढाकार घेणे आवश्यक आहे. 'एक कुटुंब - एक वृक्ष' या उपक्रमामध्ये नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे. आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त संपत बारस्कर यांनी हाती घेतलेली वृक्षारोपणाची लोकचळवळ अत्यंत स्तुत्य आणि कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

आयोजक प्रसाद विसपुते म्हणाले की, आमदार संग्राम जगताप आणि संपत बारस्कर यांच्या वाढदिवसानिमित्त प्रोफेसर कॉलनी चौक येथे मोफत फळझाडे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामध्ये आंबा, पेरू, जांभूळ यांसारख्या विविध फळझाडांचे सुमारे एक हजार रोपांचे नागरिकांना मोफत वाटप करण्यात आले. नागरिकांनी या उपक्रमाला मोठा प्रतिसाद दिला असून भविष्यातही अशा पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे आणि माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर यांनीही मनोगत व्यक्त करत वृक्षारोपण आणि संवर्धनाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनी पुढे येत 'एक कुटुंब - एक झाड' हा संकल्प प्रत्यक्षात उतरवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

---

## मानवता सेवा संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा व करिअर मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शिक्षण क्षेत्रामध्ये अमूलाग्र बदल झाले असून विद्यार्थ्यांसमोर करिअरच्या असंख्य संधी उपलब्ध झाल्या आहेत. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर आवडत्या क्षेत्रात यश संपादन करावे. दहावी आणि बारावी हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचे टप्पे असून याच काळात त्यांच्या पुढील शिक्षणाची दिशा निश्चित होत असते. त्यामुळे योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण करण्याच्या उद्देशाने मानवता सेवा संस्थेच्या वतीने दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित केला जातो, असे प्रतिपादन नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांनी केले.

मानवता सेवा संस्थेच्या वतीने आयोजित दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा व करिअर तसेच उच्च शिक्षण मार्गदर्शन कार्यशाळा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, किरण बारस्कर, डॉ. भूषण तोडमल, युवराज औंधकर, देवा गुप्ता, डॉ. अजय पवार, आदित्य काकडे, धीरज लोणारे, अक्षय वाणी, सार्थक कातोरे, अक्षय भंडारी, आकाश वाडेकर, सुरत शिंदे, अमोल गव्हाणे, श्रुतिका दरेकर, हेमलता कांबळे, दिपाली उदमले, राणी भाकरे, कांचन इंगोले, वैशाली राजहंस, अनिता भोसले, रोहिणी अंकुश आदींसह पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी किरण बारस्कर म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाबरोबरच आपल्या आवडीच्या क्रीडा क्षेत्राकडेही लक्ष दिले पाहिजे. आजच्या काळात क्रीडा क्षेत्रामध्येही करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. खेळामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबत क्रीडा, संस्कार आणि व्यक्तिमत्त्व विकासही तितकाच महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतांनुसार योग्य दिशा मिळावी यासाठी मार्गदर्शनाची गरज असते. मानवता सेवा संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन दिले जाते तसेच तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी दिशा दिली जाते, असे त्या म्हणाल्या.

# प्रभाग क्रमांक १२ च्या विकास कामांना गती देणार – नगरसेवक विकी जगताप

**प्रभाग क्रमांक १२ मध्ये आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून आशा टॉकीज चौक ते हौसिंग हॉस्पिटलपर्यंत बंद पाईप गटार व रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रभाग क्रमांक १२ मध्ये विविध विकासकामांना वेग देण्यात येत आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांना कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून आशा टॉकीज चौक, श्रीपाद ग्रंथ भंडार ते हौसिंग हॉस्पिटल या मार्गावरील बंद पाईप गटार व रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ उत्साहात संपन्न झाला.

यावेळी बोलताना नगरसेवक विकी जगताप म्हणाले की, प्रभाग क्रमांक १२ हा जुन्या गावठाण भागातील असून या भागातील अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहिले आहेत. त्यामुळे नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामे न झाल्यामुळे काही भागांमध्ये दूषित पाणीपुरवठ्याचा प्रश्न निर्माण झाला असून त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. आता हे प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून विकासकामांना गती दिली जाणार आहे. प्रभागातील नागरिकांना विश्वासात घेऊन टप्प्याटप्प्याने सर्व विकासकामे मार्गी लावली जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. मनपा प्रभाग क्रमांक १२ मध्ये आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून आशा टॉकीज चौक, श्रीपाद ग्रंथ भंडार ते हौसिंग हॉस्पिटलपर्यंतच्या बंद पाईप गटार व रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ नगरसेवक विकी जगताप यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी माजी नगरसेवक प्रा. माणिकराव विधाते, संतोष गेन्नाप्पा, संग्राम रासकर, वाल्मीक कुलकर्णी, दिनेश लोंढे, ॲड. सुभाष काकडे, पुष्कर कुलकर्णी, अमोल निस्ताने, कमलेश भंडारी, डॉ. अभिजीत हौसिंग, गंगानाथ सोनवणे, किशोर देशमुख, सतीश वैद्य, भैया घुले, चेतन सादुल, अंबादास सोनवणे, मोहित गांधी, विशाल थोरात यांच्यासह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रा. माणिकराव विधाते म्हणाले की, प्रभागात पूर्वी झालेली काही विकासकामे निकृष्ट दर्जाची असल्यामुळे ती पुन्हा करण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. श्रीपाद ग्रंथ भंडार परिसरात कायम ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर वाहताना दिसते. त्यामुळे त्या भागात दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत होता. आता आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून बंद पाईप गटार आणि रस्ता कॉंक्रिटीकरणाचे दर्जेदार काम सुरू होत आहे. पुढील अनेक वर्षांचा विचार करून शहरात नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामे केली जात असल्यामुळे ही कामे पुन्हा पुन्हा करण्याची गरज भासणार नाही.

ते पुढे म्हणाले की, प्रभाग क्रमांक १२ मध्ये विविध विकासकामांचे प्रश्न प्रलंबित असून ते सोडविण्यासाठी नगरसेवक विकी जगताप सातत्याने प्रयत्नशील आहेत. नागरिकांच्या सहकार्याने आणि लोकप्रतिनिधींच्या पाठपुराव्यामुळे या भागाचा विकास अधिक वेगाने होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या विकासकामामुळे परिसरातील सांडपाणी व्यवस्थापनाचा प्रश्न सुटणार असून रस्त्यांची अवस्था सुधारल्यामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे. तसेच भविष्यात वाहतूक, स्वच्छता आणि आरोग्याच्या दृष्टीनेही या कामाचा मोठा फायदा होणार असल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुष्कर कुलकर्णी यांनी केले तर संग्राम रासकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पारनेरच्या राजकारणात मोठा भूकंप

**आमदार दातेंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत दिग्गजांचा राष्ट्रवादीत प्रवेश**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर –** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त माटुंगा, मुंबई येथील षण्मुखानंद सभागृहात आयोजित भव्य कार्यक्रमादरम्यान पारनेर तालुक्याच्या राजकारणात मोठी घडामोड घडली. पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत तालुक्यातील विविध पक्षांतील अनेक दिग्गज नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी मंत्री धनंजय मुंडे, पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांचे उपस्थित संपन्न झाला.

या प्रवेशामध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, भाळवणी येथील उद्योजक शिवसेना शिंदे गटाचे संदिप रोहोकले, भाजपचे नगरसेवक अशोक चेडे, माजी उपनगराध्यक्ष दत्तात्रय कुलट, शिवसेनेचे उबाठा नगरसेवक नवनाथ सोबले, कांतीलाल ठाणगे, भाऊ ठुबे, माऊली औटी, सिद्धेश्वरवाडी माजी सरपंच आप्पासाहेब नरोडे तसेच योगेश दावभट, विकास केरूभाऊ रोहोकले, पवन संजय रोहोकले, उद्धव गुंजाळ, दिलीप विश्वनाथ रोहोकले, संदीप बिबिशन साळुंके, हरिदास रंगनाथ रोहकले, सुनिल बाबाजी चेमटे, मछिंद्र गोपाळा रोहोकले, संतोष भाऊसाहेब रोहकले, दत्ता कृष्णा सुरुसे, राहुल दादाभाऊ गुंजाळ, मनोहर विठ्ठल रोहोकले यांसह पारनेर शहर व तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

पारनेर तालुक्यातील विविध राजकीय प्रवाहांतील प्रभावी नेत्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसची वाट धरल्याने स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः आगामी नगरपंचायत, ग्रामपंचायत आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या पक्षप्रवेशाला मोठे राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. या प्रवेशामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची ताकद आणखी वाढली असून तालुक्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

गेल्या काही काळात आमदार काशिनाथ दाते यांनी मतदारसंघात राबविलेल्या विकासकामांमुळे, सर्वसामान्य नागरिकांशी ठेवलेल्या सातत्यपूर्ण संपर्कामुळे आणि सर्वसमावेशक नेतृत्वामुळे विविध पक्षांतील नेते व कार्यकर्ते राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे आकर्षित होत आहे.

> ''आमदार काशिनाथ दाते सर यांची जनसामान्यांशी असलेली नाळ, विकासकामांबाबतची तळमळ आणि सर्वसमावेशक कार्यपद्धती यांच्यावर विश्वास ठेवून आम्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. आज तालुक्यातील नागरिकांमध्ये दाते सरांच्या कामाची सकारात्मक चर्चा असून त्यांच्या नेतृत्वाभोवती विश्वासाचे मजबूत वलय निर्माण झाले आहे. विकासाच्या राजकारणाला प्राधान्य देणाऱ्या या नेतृत्वासोबत काम करण्याचा निर्णय आम्ही घेतला असून आगामी काळात पारनेर तालुक्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अधिक बळकट होईल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे.''
>
> **संदीप रोहोकले,** उद्योजक भाळवणी

> ''आज स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या विकासाभिमुख व सर्वसमावेशक विचारसरणी मधून घालून दिलेल्या आदर्शांच्या जोरावर मार्गक्रमण करत असलेल्या पक्षात अनेक मान्यवरांनी प्रवेश करण्याचा घेतलेला निर्णय निश्चितच अभिमानास्पद राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाची संघटनात्मक ताकद दिवसेंदिवस अधिकच वाढत आहे. पारनेर तालुक्यात आमदार दाते सरांच्या नेतृत्वाच्या माध्यमातून जनतेचा दृढ विश्वास संपादन केला जात असल्याचे हे उत्तम उदाहरण असून त्यांच्यावरील विश्वासामुळेच विविध पक्षांतील नेते आणि कार्यकर्ते राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे आकर्षित होत आहेत. आगामी काळात हा वाढता जनाधार पक्षाला अधिक बळ देणारा ठरेल, असा मला ठाम विश्वास आहे.''
>
> **प्रशांत गायकवाड,** राष्ट्रवादी नेते

(पान १ वरून)

## नगर शहराची धुरा नव्या दमाच्या अधिकाऱ्यांकडे

असल्याने नव्याने हजर होणाऱ्या अधिकाऱ्यांवर अहिल्यानगर शहराची कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहील यासाठी खूप मोठे परिश्रम घेणे गरजेचे आहे. सन २००४ मध्ये अहिल्यानगर शहरात दोन धर्मीयांमध्ये वाद होऊन दंगल झाली होती, या घटनेवेळी तत्कालीन जिल्हा पोलीस अधीक्षक मधुकरराव गावित यांच्या मार्गदर्शनाखाली शहरासह उपनगरातील विविध पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी आपले कर्तव्य व्यवस्थित पार पाडून शहरात शांतता प्रस्थापित केली होती अर्थातच सर्वांना जनतेचे ही सहकार्य मिळाले होते. त्यानंतर अद्यापही नगर शहरात किरकोळ घटना वगळता मोठा अनुचित प्रकार घडलेला नाही अहिल्यानगर शहरात शांतता आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शहरातील गुन्हे शाखेसह विविध पोलीस ठाण्यांच्या अधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न करून आपले कर्तव्य बजावले होते विशेष म्हणजे आज पर्यंत प्रत्येक पोलीस ठाण्याच्या प्रभारी पदी शहराच्या परिस्थितीचा अभ्यास आणि अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांचीच नियुक्ती झाल्याचे पाहायला मिळत होते त्यामुळे शहरातील शांतता अबाधित ठेवण्यासाठी या अधिकाऱ्यांना जनतेचे ही विशेष सहकार्य मिळत होते.

## अशोक खरात खटल्यात ॲड. परिमल फळे सरकारतर्फे बाजू मांडणार

ॲड. परिमल फळे यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

ॲड. परिमल फळे हे फौजदारी कायद्यातील अनुभवी वकील म्हणून ओळखले जातात. यापूर्वी राज्यभर गाजलेल्या राहुरी येथील आढाव वकील दाम्पत्य हत्या प्रकरण तसेच नेवासे येथील ॲड. रियाज पठाण हत्या प्रकरणातही सरकारतर्फे ॲड. उज्ज्वल निकम यांच्यासमवेत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या दोन्ही संवेदनशील आणि चर्चित खटल्यांमध्ये निकम व फळे हे विधीज्ञ सरकारची बाजू प्रभावीपणे मांडत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध गाजलेल्या खटल्यांमधील त्यांच्या कामामुळे ॲड. परिमल फळे यांनी न्यायालयीन क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. बहुचर्चित रेखा जरे खून, निघोज, ता. पारनेर येथील संदीप वारळ हत्या प्रकरणासह, निघोज ता. पारनेर येथील सुनील पवार खटल्यात आरोपी प्रवीण रसाळ यांच्या बाजूने तसेच अनेक महत्त्वाच्या फौजदारी खटल्यांमध्ये त्यांनी यशस्वीपणे बाजू मांडली आहे. आता भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात राज्य सरकारने पुन्हा एकदा ॲड. उज्ज्वल निकम आणि ॲड. परिमल फळे या अनुभवी जोडीवर विश्वास दाखविल्याने या खटल्याच्या पुढील सुनावणी व न्यायालयीन प्रक्रियेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## गुन्हेगारी आणि अवैध धंद्यांविरोधात खरवंडी कासारमध्ये ३ तास रास्ता रोको; बाजारपेठ कडकडीत बंद

भीतीचे सावट तयार झाले आहे गेल्या काही दिवसांत खरवंडी कासार आणि परिसरातील किर्तणवाडी भारजवाडी वाड्या–वस्त्यांवर नागरिकांना मारहाण करून दरोडे टाकण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. यामुळे सर्वसामान्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

यासोबतच गावात गुटखा, मावा, अवैध दारू विक्री, मटका आणि पत्त्यांचे क्लब असे अवैध धंदे जोरात सुरू आहेत. या प्रकारांमुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे आंदोलनकर्त्यांच्या मुख्य मागण्या खरवंडी कासार येथील पोलीस चौकीतील पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या तातडीने वाढवण्यात यावी. पोलीस चौकीसाठी दोन सशस्त्र मुख्य पोलीस अधिकारी नेमण्यात यावेत.परिसरातील सर्व अवैध धंदे कायमचे बंद करण्यात यावेत.वाड्या–वस्त्यांवरील दरोडेखोरांचा बंदोबस्त करून सर्वसामान्यांना न्याय मिळावा.पक्ष विरहीत आंदोलनहे आंदोलन कोणत्याही एका पक्षाचे नसून, सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी करण्यात आले. आंदोलनाचे नेतृत्व किसन आव्हाड आणि अजिनाथ किर्तने यांनी केले. या आंदोलनात खरवंडी कासारसह आजूबाजूच्या परिसरातील नागरिक आणि व्यापारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.प्रशासनाचे आश्वासन आणि आंदोलन मागेआंदोलनाची माहिती मिळताच पाथर्डीचे पोलीस उपनिरीक्षक, तहसीलदार प्रतिनिधी आणि खरवंडी सजाचे तलाठी ब्रम्हणनाथ यांनी आंदोलनस्थळी धाव घेतली. त्यांनी आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांचे लेखी निवेदन स्वीकारले. ''या मागण्यांबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने अहवाल सादर केला जाईल आणि लवकरच तुमच्या मागण्या मान्य केल्या जातील,'' असे लेखी आश्वासन प्रशासनाने दिले. या आश्वासनानंतर नागरिकांनी आपले तीन तासांचे आंदोलन मागे घेतले.

## धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या खऱ्या मास्टर माईंडचा पोलिसांनी छडा लावावा – किरण काळे

कष्टकरी, कामगारांना सुखाने व शांततेने पोट भरता यावे एवढीच माफक अपेक्षा त्यांची आहे.

त्यामुळे माळीवाडा गोमांस प्रकरणातील भोसले नामक आरोपी महिलेला अटक करून धार्मिक तेढ निर्माण करू पाहणाऱ्यांचा पर्दाफाश केल्याबद्दल पोलीस दलाचे विशेष कौतुक आम्ही करतो. मात्र पोलिसांनी आता पूर्ण सत्य समोर आणण्यासाठी खऱ्या समाजकंटक मास्टर माईंडचा छडा लावावा, अशी मागणी ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का यांच्याकडे केली आहे.

बकरी ईदच्या रात्री माळीवाडा येथील ब्राह्मण गल्लीत गोमांस टाकल्याचा प्रकार उघड झाला होता. यामुळे मोठा तणाव निर्माण झाला होता. दीडशेहून अधिक सीसीटीव्ही फुटेजचे पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण केले. पोलिसांच्या कौतुकास्पद कामगिरीबद्दल अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षकांचा सन्मान ठाकरे शिवसेना, रिपाई गवई गट व नगरकरांच्या वतीने भारतीय संविधानाची उद्देश पत्रिका देऊन करण्यात आला. यावेळी कोतवालीचे निरीक्षक संभाजीराव गायकवाड आणि संपूर्ण टीमचे देखील आभार मानण्यात आले.

यावेळी रिपाई गवई गटाचे जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, संजय झिंजे, मनोज गुंदेचा, विलास उबाळे, अनिस चुडीवाला, उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, उपजिल्हाप्रमुख पै. दीपक भोसले, राम वाणी, चंद्रकांत उजागरे, राम झिने, उषा भगत, शारदा वाघमारे, मीना रणशूर, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, राम धोत्रे, किशोर कोतकर, शंकर आव्हाड, विनोद शिरसाट, धनंजय देशमुख आदी उपस्थित होते.

आरोपीचा जबाब न पटणारा :

किरण काळे म्हणाले, भीक मागून उदरनिर्वाह करते. त्यावेळी कुणीतरी दिलेला पण नको असलेल्या मांसाचा तुकडा माळीवाड्यात टाकला, हा आरोपीचा जबाब कदापि पटणारा नाही. मुळात भीक मागण्यासाठी मुस्लिम वेश परिधान करणं, संशयास्पद वाटाव्या अशा हालचाली करण अनेक प्रश्न उपस्थित करतात. भीक म्हणून मांस कोण देतं? हा आरोपीचा बनाव आहे. केवळ अर्धसत्य समोर आलं आहे. पोलिसांनी पूर्ण सत्य समाजासमोर आणावं. त्यासाठी घटना घडण्याच्या आधी व नंतर आरोपी कोणाच्या संपर्कात होती, तिला कोणाचे राजकीय पाठबळ होते का, त्याचा शोध घ्यावा. आरोपीचा सीडीआर, टॉवर लोकेशन तपासावे, अशी मागणी यावेळी काळे यांनी केली.

गंगा उद्यान प्रकरणाचा छडा लावा :

गंगा उद्यान नमाज पठण प्रकरणाचा देखील सखोल तपास पोलिसांनी करावा. भारतीय मुस्लिम काब्याकडे, सूर्यास्ताच्या दिशेने तोंड करून नमाज पठण करतात. मात्र गंगा उद्यान प्रकरणात उत्तर दिशेकडे तोंड करून नमाज पठण केल्याचे समोर आले आहे. धार्मिक तेढ निर्माण करण्यासाठी काही समाजकंटकांचे यामागे षडयंत्र आहे का ? याचा लवकरात लवकर पोलिसांनी छडा लावावा, अशी मागणी यावेळी किरण काळे यांनी केली.

## लाडकी बहीण स्वावलंबी झाली पाहिजे

सुमारे ११ हजार रुपये किमतीच्या किटचे वितरण गुरुवारी खासदार लंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना आरोग्यविषयक सुविधा तसेच आरोग्य कार्डचाही लाभ उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

महिलांना घरबसल्या रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येणार असून महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या विक्रीची जबाबदारीही प्रतिष्ठान व संबंधित यंत्रणांकडून घेतली जाईल, असे खा. लंके यांनी स्पष्ट केले. उत्पादन तयार करणे महत्त्वाचे असले तरी त्याला बाजारपेठ उपलब्ध करून देणे अधिक आवश्यक असल्याने महिलांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळवून देण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शासनाच्या विविध कल्याणकारी योजना प्रत्यक्ष गरजूंपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे सांगताना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाचा लाभ पोहोचविणे हे लोकप्रतिनिधी म्हणून आपले कर्तव्य असल्याचे खा. लंके यांनी नमूद केले.

आपल्या भाषणात त्यांनी या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी परिश्रम घेणाऱ्या कार्यकर्त्यांचे विशेष कौतुक केले.

रूईछत्रपतीच्या माजी सरपंच अर्चना साबळे, शितल पोटे, रेश्मा मन्यार, सोनम पठारे आणि चंदू खेमनर यांनी असंघटित बांधकाम कामगारांना या योजनेचा लाभ मिळवूनदेण्यासाठी मोठी मेहनत घेतल्याचे त्यांनी सांगितले. शासनाच्या योजना अस्तित्वात असल्या तरी माहितीअभावी किंवा प्रशासकीय अडचणींमुळे त्या अनेकदा गरजूंपर्यंत पोहोचत नाहीत. अशा परिस्थितीत पात्र लाभार्थी शोधून त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हे मोठे सामाजिक कार्य असल्याचे त्यांनी नमूद केले. वितरित करण्यात आलेल्या साहित्य किटची किंमत सुमारे ११ हजार रुपये असल्याचे सांगताना खा. लंके यांनी लाभार्थ्यांना आरोग्य कार्डची सुविधाही उपलब्ध होणार असल्याचे स्पष्ट केले. आतापर्यंत अनेक लाभार्थ्यांनी आरोग्यविषयक सुविधांचा लाभ घेतला असून भविष्यात आणखी मोठ्या संख्येने कामगार या योजनेशी जोडले जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सामाजिक बांधिलकी जपत काम करणे हीच आपली कार्यपद्धती असल्याचे सांगताना खा. लंके म्हणाले की, ज्या–ज्या ठिकाणी नागरिकांना अडचणी निर्माण होतात तेथे मदतीचा हात देण्यासाठी नीलेश लंके प्रतिष्ठानचे सहकारी तत्पर असतात. समाजातील दुर्बल, वंचित आणि गरजू घटकांना आधार देणे ही आमची जबाबदारी आहे. यावेळी त्यांनी दिव्यांग संघटनेचे सुनील करंजुले यांच्या कार्याचाही विशेष गौरव केला. दिव्यांगांसाठी त्यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक जण स्वतः आणि स्वतःच्या कुटुंबापुरतेच विचार करतात. मात्र प्रत्येक व्यक्ती आपल्या कुटुंबातील सदस्य आहे, अशी भावना ठेवून काम केल्यास समाजाला त्याचा मोठा फायदा होतो. समाजातील एखाद्या गरजू व्यक्तीला मदत केली तर त्यामागे संपूर्ण समाज उभा राहतो, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

शासकीय योजनांच्या लाभासाठी लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणींबाबत बोलताना खा. लंके यांनी ठाम आश्वासन दिले. शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेताना कागदपत्रे अथवा प्रशासकीय स्तरावरील अडचणी निर्माण झाल्यास त्या दूर करण्यासाठी आम्ही तुमच्या पुढे दोन पावले असू, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर यांनी शासनाच्या योजनांची माहिती अनेकदा सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचत नसल्याचे सांगितले. मात्र खासदार नीलेश लंके यांच्या पुढाकारामुळे विविध योजनांचे लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत असल्याचे त्यांनी नमूद केले. असंघटित बांधकाम कामगारांसाठी असलेल्या विविध योजनांचा लाभ अधिकाधिक कामगारांना मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

या कार्यक्रमास सुदाम पवार, नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, उपनगराध्यक्षा सुप्रिया शिंदे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, जितेश सरडे, अभयसिंह नांगरे, विजय डोळ, सचिन पठारे, माजी नगराध्यक्ष नितीन अडसूळ, दिव्यांग संघटनेचे सुनील करंजुले, दीपक लंके, डॉ. सचिन औटी, प्रा. संजय लाकूडझोडे, राजेंद्र शेरकर, बलभीम कुबडे, अमित जाधव, सुभाष शिंदे, दादा शेटे, माजी सरपंच अर्चना साबळे, शितल पोटे, रेश्मा मन्यार, सोनम पठारे, चंदू खेमनर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते.